महाराष्ट्र शासन

क्र. लपायो-२०१७ / प्र.क्र. २२६ /जल-१
मृद व जलसंधारण विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक : १७ ऑक्टोबर, २०१७.

प्रति,
**सर्व विभागीय आयुक्त,**
**सर्व जिल्हाधिकारी,**

विषय : जलयुक्त शिवार अभियानातंर्गत सन २०१७-१८ या वर्षी टंचाईमुक्त करण्यासाठी निवड करण्यात आलेल्या गावातील आराखडयानुसार हाती घ्यावयाच्या दुरुस्तीच्या कामासंदर्भात.

राज्यात सन २०१५-१६ पासून जलयुक्त शिवार अभियान हा अत्यंत महत्वाकाक्षी कार्यक्रम राबविण्यात येत असून या कार्यक्रमातंर्गत दरवर्षी किमान ५००० गावे व ५ वर्षात सुमारे २५००० गावे टंचाईमुक्त करण्याचे धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. त्यानुसार सन २०१५-१६ यावर्षी ६,२०२ गावे व सन २०१६-१७ यावर्षी ५,२९१ गावाची निवड करुन अभियानाची अमलबजावणी करण्यात आलेली आहे. सन २०१७-१८ यावर्षी देखील ५००० गावांची निवड करण्यात आलेली असून दिनांक १५ सप्टेंबर, ते ३० सप्टेंबर, २०१७ या कालावधीत गावांच्या Treatment Potential Map व शिवार फेरीच्या आधारे गावा आराखडा निश्चित करण्याचे काम पुर्ण करावयाचे होते. त्याच प्रमाणे आराखडयास मान्यता देवून दिनांक १ नोव्हेंबर,२०१७ पासून प्रत्यक्ष कामे सुरु करावयाची आहेत.

अभियान अतंर्गत सन २०१७-१८ या वर्षाकरीता निवडण्यात आलेल्या गावांमधील अभियानाची अमलबजावणी करण्यासंदर्भात शासनाकडून निर्गमित करण्यात आलेल्या विविध सूचना विचारात घेऊन अभियानाची अमलबजावणी अधिक सुयोग्य पध्दतीने करण्यासाठी सर्व विभागीय स्तरावर अभियानाशी संबंधीत सर्व क्षेत्रीय यंत्रणांच्या कार्यशाळा नुकत्याच पार पडलेल्या असून या कार्यशाळामध्ये अभियान अमलबजावणी संदर्भात तपशिलवार मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. या कार्यशाळामध्ये पाझर तलाव, गाव तलाव, माती नाला बांध, सिमेंट नाला बांध, कोल्हापूरी पध्दतीचा बंधारा व दगडी सिमेंट नाला बांध या उपचाराच्या दुरुस्तीच्या कामासंदर्भात शासन स्तरावर विचाराधिन असलेल्यां प्रस्तावित मापदंडाबाबत मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. आता या संदर्भात असे कळविण्यात येते की, जलयुक्त शिवार अभियान अतंर्गत घ्यावयाच्या वर नमूद उपचाराच्या दुरुस्तीच्या कामांसदर्भात दुरुस्तीवरील खर्च हा अशा उपचाराच्या **नविन कामाच्या प्रचलित आर्थिक मापदंडाच्या कमाल २० टक्के पेक्षा अधिक असणार नाही याची दक्षता घ्यावी.** या संदर्भात तपशिलवार मार्गदर्शक सूचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्याची कार्यवाही शासन स्तरावरुन करण्यात येत आहे.

१७/१०

(एकनाथ डवले)
सचिव (मृद व जलसंधारण)